# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, सिव्हील लाईन्स
नागपूर- ४४०००१)

ईमेल आयडी- mconagpur@gov.in


क्रमांक : १७/कोव्हीड-१९/२०२१ दिनांक :- १९.०४.२०२१

**आदेश :-**

वाचा
१. महसलू व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांचेकडील आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि. 13.04.2021
२. या कार्यालयाचे आदेश क्र. 12/COVID-19/2021 दि.14.04.2021
३. या कार्यालयाचे आदेश क्र. उपायुक्त (मालमत्ता)/30/2021 दि.16.04.2021

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड २ नुसार राज्याला मिळालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्र राज्यात साथरोग अधिनियमातील खंड २, ३ व ४, ची अंमलबजावणी करण्याकरिता क्र. कोरोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३ मार्च, २०२० अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने (कोव्हीड-१९) उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हीड-१९, उपाययोजना नियम २०२० यातील नियम ३ नुसार शहरी भागात आयुक्त, महानगरपालिका यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे व त्यांना कार्यक्षेत्रातील कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे.

ज्याअर्थी, या कायद्याच्या नियम १० अन्वये आयुक्त, महानगरपालिका यांना (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, नागपूर शहर सिमेत कोरोना विषाणूचा वाढता प्रार्दूभाव लक्षात घेता त्यास प्रतिबंध करण्यास्तव आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक असल्याने दि.१४.०४.२०२१ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले होते.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ३ दि. १६.०४.२०२१ आदेशान्वये नागपूर शहरात कोव्हीड-१९ चा विषाणूचा वाढता प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने नागपूर शहरातील आठवडी बाजाराकरिता काही उपाययोजना व निर्बंध लावण्यात आले होते. फक्त अत्यावश्यक सेवेशी निगडीत असलेली सर्व दुकाने (मेडीकल दुकाने वगळून) सम/विषम तत्वावर सुरु ठेवता येईल, असे आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर आदेश रद्द करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, नागपूर शहर सिमेत कोरोणा विषाणूचा प्रादूर्भाव अतिशय झपाटयाने वाढत असल्याने त्यावर आवश्यक उपाययोजना म्हणून यापूर्वी या कार्यालयातर्फे निर्गमित केलेल्या संदर्भ क्र. २ वरील दि. १४.०४.२०२१ चे आदेशात काही कडक निर्बंध लावणे आवश्यक आहे असे माझे मत झाले आहे.

P.T.O.

Scanned with CamScanner

**त्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र. १ वरील दि. १३.०४.२०२१ चे आदेश व त्याअनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र. २ वरील दि. १४.०४.२०२१ वरील आदेशात अंशत: बदल करुन उक्त आदेशातील नमूद अटी शर्ती सह अत्यावश्यक सेवशी निगडीत दुकाने / आस्थापना या आदेशात पुढे दिलेल्या नमूद वेळे प्रमाणे सुरू राहतील. सदर आदेश दिनांक २०.०४.२०२१ ते ३०.०४.२०२१ पर्यंत लागू राहतील.**

१. नागपूर शहरातील शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ, शिकवणी वर्ग, प्रशिक्षण संस्था (कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था) व इतर तत्सम संस्था सुरु ठेवण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तथापि, या संस्थाद्वारे ऑनलाईन स्वरूपात कामकाज सुरू ठेवता येईल. तसेच राष्ट्रीय/राज्य/विद्यापीठ/शासन स्तरावरील पूर्वनियोजित परिक्षा कोव्हीड विषयक सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन करून घेता येतील.

२. नागपूर शहर सिमेत सर्व प्रकारच्या धार्मिक सभा, राजकीय सभा, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम यावर प्रतिबंध घालण्यात येते.

३. धार्मिक/पुजाअर्चनेची स्थळे नागरिकांना दर्शनासाठी बंद राहतील. तथापि, सदर स्थळाची नियमित पुजाअर्चना/साफसफाई विषयक दैनदिन कामे जास्तीत जास्त ५ व्यक्तींच्या उपस्थितीच्या मर्यादेत करण्यास मुभा राहील.

४. नागपूर शहरातील सर्व आठवडी बाजार बंद राहतील.

५. रेस्टांरेट / हॉटेल / खाद्यगृह मधील प्रत्यक्ष डायनिंग सुविधा बंद राहील. मात्र होम डिलीव्हरी सुरू ठेवण्याची मुभा राहील व त्यासाठी किचन रात्री ११.०० वाजेपर्यंत सुरू राहू शकतील.

६. तरणतलाव (Swimming Pools) बंद राहतील.

७. सर्व प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन बंद राहतील.

८. सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालय (अत्यावश्यक सेवेशी संबंधित कार्यालय वगळून) त्यांच्या एकूण क्षमतेच्या केवळ ५० टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीने सुरू ठेवता येतील.

९. सर्व खाजगी आस्थापना/कार्यालय पूर्णपणे बंद राहतील.

१०. मॉल्स, चित्रपटगृहे/नाट्यगृहे बंद राहतील.

११. अत्यावश्यक सेवेशी संबंधित दुकाने वगळून इतर सर्व दुकाने व मार्केट बंद राहतील.

१२. नागपूर शहरातील उद्याने नागरिकांसाठी बंद राहतील.

१३. व्यायामशाळा/जीम बंद राहतील.

१४. अत्यंत तातडीचे नसलेली (Elective surgery) शात्रक्रिया पुढे ढकलणे शक्य असल्यास अशा शात्रक्रिया पुढे ढकलण्यास याव्यात.

१५. वकील, सी.ए. यांची कार्यालये सुरु ठेवता येतील.

Scanned with CamScanner

तसेच सदर कालावधीत खालील सेवा/आस्थापना सुरू राहू शकतील.

| काय सुरु राहतील | सुरु राहण्याची वेळ |
|---|---|
| वैद्यकीय सेवा, मेडिकल स्टोअर्स | सुरु राहतील |
| वृत्तपत्र, मिडीया संदर्भातील सेवा (ओळखपत्राच्या आधारे) | सुरु राहतील |
| पेट्रोल पंप, गॅस एजन्सी | सुरु राहतील |
| सर्व प्रकारच्या प्रवासी वाहतुक सेवा | ऑटो रिक्षा (चालक + दोन प्रवासी) |
| | ट्रक्सी (चालक + ५० % प्रवासी क्षमता) |
| | बस ( प्रवासी क्षमते नुसार)<br>उभे प्रवासी अनुज्ञेय राहणार नाही |
| माल वाहतूक सेवा | सुरु राहतील |
| बांधकामे (फक्त साईटवरच लेबर उपलब्ध असल्यास) | सुरु राहतील |
| बँक व पोस्ट सेवा | सुरु राहतील |
| कोरोना विषयक लसीकरण सेवा व चाचणी केंद्रे | सुरु राहतील |
| अत्यावश्यक सेवेतील उद्योग व कारखाने संदर्भ क्र. १ वरील आदेशानुसार | सुरु राहतील |
| किराणा दुकाने, बेकरी दुकान | सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत |
| दुध व्रिकी / फळे व्रिकी व पुरवठा | सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत व संध्याकाळी ०५.३० ते संध्याकाळी ०७.३० वाजेपर्यंत |
| भाजीपाला व्रिकी व पुरवठा / रस्त्यावरील हातठेले | सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत |
| चिकन, मटन, अंडी व मास दुकाने | सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत |
| पशु खाद्य दुकाने | सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत |
| ऑप्टीकल्स दुकाने | सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत |
| खते व बी-बियाणे दुकाने | सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत |
| निवासाकरिता असलेले हॉटेल/लॉजेस (५० टक्के क्षमतेने) | फक्त हॉटेल मध्ये निवासी असलेल्या ग्राहकांसाठीच किचन सुरु ठेवता येईल. |

- एका ठिकाणी ५ पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र येवू नये.
- सर्व नागरिकांनी अत्यावश्यक बाबीं व्यतिरिक्त घराबाहेर पडू नये/फिरू नये.
- ज्या सेवा/आस्थापना सुरू ठेवण्यास याद्वारे परवानगी देण्यात आली आहे, त्यांनी या कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोव्हीड-१९ विषयक नियमांचे/निर्देशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

ज्या आस्थापना व नागरीक उपरोक्त आदेशाचे उल्लंघन करतील ते सर्व संबंधीत, इतर अनुषंगीक दंडात्मक कार्यवाहीसह साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, भा.द.वि. १८६० चे संबंधीत तरतदू अन्वये गुन्हा दाखल होण्यास पात्र राहतील.

P.T.O.

Scanned with CamScanner

या आदेशाची अंमलबजावणी व कारवाई करण्यास्तव नागपूर महानगरपालिकेचे उपद्रव शोध व निर्मूलन पथकातील कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, मुख्य स्वच्छता अधिकारी, संबंधित झोनचे सहाय्यक आयुक्त व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे महानगरपालिकेचे सर्व संबंधित अधिकारी, सर्व संबंधित पोलिस उपनिरीक्षक व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे पोलिस अधिकारी व रेल्वे परिसरात यासंबंधीत अनुपालन करणेस्तव नियुक्त केलेले सक्षम अधिकारी यांनी या आदेशाची नोंद घेऊन याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत दक्षता घ्यावी व आवश्यक अनुषंगीक कार्यवाही करावी.

१९/४/२

राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी आवश्यक कार्यवाहीस्तव :

१. मा. पोलिस आयुक्त, नागपूर शहर, नागपूर
२. अति.आयुक्त (सामान्य/शहर/सेवा) म.न.पा. नागपूर
३. सर्व विभागप्रमुख, म.न.पा. नागपूर
४. सहाय्यक आयुक्त झोन क्र. १ ते १०, महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी माहितीस्तव सादर :-

१. मा. महापौर/उपमहापौर/स्थायी समिती अध्यक्ष/सत्तापक्ष नेता/विरोधीपक्ष नेता, म.न.पा., नागपूर
२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर

१९/४/२

राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

Scanned with CamScanner